International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासी नियतकालिकातील कला साहित्य आणि संस्कृती दर्शन

**प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे [1], उर्मिला नारायण क्षीरसागर[2]**

[1]*मार्गदर्शक, प्राचार्य व विभाग प्रमुख,*

*कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता. गेवराई, जि. बीड.*

[2]*पीएच.डी संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर.*

***Corresponding Author – प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे***

**DOI - 10.5281/zenodo.17656475**

***सारांश:***

*पेशवाईचा अस्त आणि ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ या महत्त्वपूर्ण राजकीय घटना आणि स्थित्यंतराबरोबर भाषिक, वाङ्गयीन, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीकोनातून इ.स. १८१८ हे वर्ष अतिशय महत्त्वाचे मानले जाते. औद्यागिक आणि भौतिक सुधारणावादी ब्रिटिशांच्या भारतातील पदार्पनामुळे ब्रिटिश सत्तेबरोबर इंग्रजी भाषा, साहित्य आणि संस्कृतीही भारतात आली. इंग्रजी भाषेचा भारतीयांवरील प्रभाव, मुद्रणजोड, छापखाना विकास, नवशिक्षण पुरस्कर्ते एलफिन्स्टन, मन्-रो यांचे उदारमतवादी इंग्रजी शासकीय धोरण, त्या शासनधोरणाचा शैक्षणिक व सांस्कृतिक प्रभाव, भाषांतरयुगास प्रारंभ, अर्वाचिन ललित वाङ्याचा जन्म, इंग्रजी शिक्षण व धर्मप्रसाराला विरोध करणाऱ्या एत्तदेशियांच्या वाङ्यासही मिशनऱ्यांचा हातभार आणि सहकार्य ज्ञानसंपादनास आलेले महत्त्व इ. घडामोडींमुळे या कालखंडातील वातावरण ढवळून निघाले. वाक्यापासून संस्कृतीपर्यंत ब्रिटिशांचे अनुकरण सुरु झाले. इंग्रजी भाषेशी परिचय होऊन मुद्रणकलेचा शोध लागला तसतसे अनेक नवग्रंथ निर्मिती, अभिव्यक्तीचे नवे प्रकार, नवीन नियतकालिके आणि वृत्तपत्रे यांची छपाई होऊ लागली. १९६० नंतर मराठी साहित्यात जे नवनवीन वाङ्गयीन प्रवाह निर्माण झाले त्यात दलित आंबेडकरी साहित्य प्रवाहाशी, चळवळीशी जवळचा आणि बहुतांश साम्य असणारा प्रवाह म्हणजे आदिवासी साहित्य प्रवाह! 'आदिवासी प्रतिभावंताचे मराठी साहित्य' या लेखात डॉ. श्रीपाल सबनीस म्हणतात, "दलित व आदिवासी यांच्या संबंधाने 'एक पिंजऱ्यातील तर दुसरा जंगलातील वाघ' असण्याची अर्थपूर्ण नोंद भुजंग मेश्राम करतात. दोन्ही समाजाच्या अस्मितेचे व संघर्षाचे प्रश्न सारखे असल्याने समन्वय आवश्यक असल्याचे मतही मेश्राम मांडतात, आपल्यामुळे कालबाह्य संस्कृती विरोधात लढाई करतांना प्रस्थापित व्यवस्था व साहित्या विरुध्दही संघर्ष आवश्यक असल्याचे मत मेश्राम नोंदवतात, याच संदर्भात लोकसाहित्य निर्मितीपेक्षा विद्रोही साहित्याची गरज त्यांनी प्रमाण मानली."*

***बीजशब्द: आदिवासी नियतकालिक, आदिवासी साहित्य व संस्कृती, संस्कृती जतन, संवर्धन, संक्रमण.***

**प्रस्तावना:**

ठराविक कालाच्या अंतराने उपलब्ध केल्या जाणाऱ्या 'नियतकालीक' या वाक्यात सन १९३४ साली 'मॉडर्न रिव्हयू' या नियतकालिकातून डॉ. वेरिअर एल्विन यांनी अगदी पहिल्याप्रथम आदिवासी जमातीच्या समस्यावर लेख लिहिला. ह्या लेखाद्वारे डॉ. एल्वीन यांनी बैगा आदिवासीची बिकट आर्थिक परिस्थिती त्यांचे अज्ञान व त्याचबरोबर मंत्रमुग्ध

करणारी त्यांची जीवनपध्दती ह्या बाबीचे यथार्थ चित्रण केले आहे. ते लिहितात, "आदिवासी जीवनपध्दती मंत्रमुग्ध करणारी आहे; परंतु त्यांच्या गरिची व कष्टाचा नुसता विचार जरी मनात आला, तरी आपल्यासारख्यांची झोप निश्चीतच उडाल्याशिवाय राहणार नाही. अशा परिस्थितीत ज्या समाजाने पिढ्यानपिढ्या आदिवासीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करुन त्यांची वाईट अवस्था केली त्या समाजास कोणती शिक्षा द्यावी असा प्रश्न मनात आल्याखेरीज राहत नाही" यावरुन आपणास आदिवासीच्या स्थितीची कल्पना येते.

### आदिवासी शब्दाचा अर्थ:

मानवाचा सुसंबंध इतिहास शोधताना प्राचिन काळात ज्यांची पावले या भूमीत रोवली गेली तो लोकसमूह म्हणजे आदिवासी होय. आर्य अनार्य यांच्या भीषण संघर्षातून आदिमांची सर्वांगिन धुळधाण झाली, भीषण नरसंहार झाला. "इंपिरिअल गॅझेटमध्ये आदिवासी शब्दाची व्याख्या केली आहे. 'समान बोली भाषा बोलणाऱ्या व एकाच भूभागात राहणाऱ्या सुरवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात" आदिवासी शब्दाचे भिन्न भारतीय अभारतीय प्रचलित कोशातील अर्थ 'आदिवसी दमन, शोषण और यथार्थ' या पुस्तकात डॉ. जालिंदर इंगळे यांनी याप्रकारे सांगितला आहे.

### संस्कृती म्हणजे काय:

आदिवासी नियतकालिकातील संस्कृतीचे दर्शन जाणून घेण्यापूर्वी संस्कृती म्हणजे काय याचा अर्थ धोडक्यात जाणणे आवश्यक आहे. मानवशास्त्रज्ञ एडवर्ड टेलर यांच्या मतानुसार "ज्ञान, श्रध्दा, कला, नीतिनियम, कायदा, रुढी यांचा तसेच माणूस समाजाचा एक सभासद म्हणून ज्या ज्या क्षमता व सवयी आत्मसात करतो त्या सर्वांचा एक व्यामिश्र बंध म्हणजे संस्कृती" इरावती कर्वे यांनी संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती होय' असे मत व्यक्त केले आहे. हरिदत्त वेदालंकार यांच्या मतानुसार "भौतिक उन्नतीसे शरीरकी भूख मीट सकती है, किंतु इसके बावजूद मन और आत्मा तो आत्मसंतुष्टही बने रहते है। इसे संतुष्टकरनेके लिए मनुष्य अपना जो विकास और उन्नती करता है उसे संस्कृती कहते है।" म्हणजेच आत्मिक आणि भोतिक उन्नतीसाठी मानवाने केलेल्या आचार, विचार, राहणीमान इ.तील मुल्यात्मक स्वीकार तसेच सम्यक कृती म्हणजे संस्कृती होय असे म्हणता येईल.

### आदिवासी नियतकालिकातील कला, साहित्य व संस्कृती दर्शन:

नागरी समाजापासून आणि भौतिक साधनसुविधांपासून दूर जंगलात, रानटी अवस्थेत जीवन जगणाऱ्या आदिवासींची समृध्द परंपरा, कला साहित्य व संस्कृतीदर्शन घडविण्यासाठी आदिवासी नियतकालिकाचा जन्म झाला. 'आदिवासी साहित्य चिंतन आणि चिकित्सा' या पुस्तकात डॉ. तुकाराम रोंगटे आदिवासी नियतकालिकासंदर्भात पुढील विवेचन करतात. "मराठीतील पहिले नियतकालीक 'दर्पन' हे सन १९३२ साली कार्य करु लागले असले तरी आदिवासीचे हक्काचे नियतकालीक जन्माला यायला तब्बल १२१ वर्ष लागली. सन १९५१ साली श्री. तु. ना. काटकर यांनी चंद्रपूर येथून गोंडवाना साहित्य संस्थेचे मुखपत्र 'मधुबन' हे नियतकालिक खास आदिवासींच्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी व समस्या निवारण्यासाठी सुरु केली. त्यानंतर सन १९७२ मध्ये मो. ग. लोटलीकर ह्यांनी जव्हार जि. ठाणे येथून

दि. १५ जुलै रोजी 'आदिवासी टाईम्स' नावाचे पहिले पाक्षिक सुरु केले. तिसरा महत्त्वाचा प्रयत्न सनदी अधिकारी डॉ. गोविंद गारे ह्यानी सन १९७९ मध्ये पुणे येथून 'आदिवासी संशोधन पत्रिके' ला जन्म देऊन केला. प्रा. रा. के. मुटाटकर ह्यांनी सन १९८० मध्ये पुणे येथूनच 'हाकारा' हे त्रैमासिक सुरु केले. नागपूरहून डॉ. टी. यू. नंदनवार ह्यांनी सन १९८१ रोजी 'ट्रायबल वेल्फेअर हे साप्ताहिक सुरु केले, एक आगळावेगळा प्रकल्प म्हणजे श्री गणेश देवी ह्यांनी वडोदरा येथून सन १९९८ रोजी 'ढोल' नावाचे नियतकालिक सुरु केले. आज २१ व्या शतकाच्या पूर्वसंध्येला अनुसरुन अकोले येथून डॉ. संजय लोहकरे चालवित असलेले 'फडकी' हे मासिक होय. 'फडकी' हे चिंदक धांदूक नसून ते आदिवासी मातेचे महावस्त्र आहे. ह्याची शिकवण देण्याचे कार्य ह्या मासिकाने करावे ही त्याची जमेची बाजू म्हणावी लागेल." आदिवासींची प्रबोधन करणारी, त्यांना दिशा देणारी त्यांच्या कला, साहित्याला वैचारिक साहित्याला जागा देणारी ही आदिवासी नियतकालिके आदिवासीच्या अज्ञात अशा बोली लिपी, संस्कृतीबाबत ज्ञान इतर उर्वरित जगाला पूरवताना दिसतात. मात्र आज चरीचशी आदिवासी नियतकालिके आर्थिक मदत तसेच अनुदान अभावी बंद होण्याच्या स्थितीत दिसतात.

३ मे १९६३ रोजी स्थापन झालेल्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेने आपल्या 'आदिवासी संशोधन पत्रिकेचा पहिला अंक डॉ. गोविंद गारे यांच्या मार्गदर्शनाखाली १९७९ मध्ये प्रसिध्द केला. सहा महिन्यातून एकदा प्रसिध्द करण्यात येत असलेल्या षण्मासिकाचे अंतरंग आणि स्वरुप पाहिल्यास आदिवासीचेच जीवनदर्शन घडते. 'आदिवासी विकास व समस्या', 'आदिवासींचे शिक्षण', 'आदिवासी साहित्य व कला', 'आदिवासी जीवन व संस्कृती', 'आदिवासींचे कलाविश्व', 'आदिवासीचे लोकजीवन', 'आदिवासीचे प्रश्न आणि नियोजन' अशा काही महत्त्वाच्या अभ्यासपूर्ण लेखांनी ही पत्रिका परिपूर्ण असते, हे लेख वैचारिक आणि संशोधनात्मक असतात, 'आदिवासीमधील सांस्कृतिक बदल आणि संघर्ष वा लेखात डॉ. गोविंद गारे म्हणतात, "आदिवासी समाजात नवा प्रवाह निर्माण होत आहे आदिवासींना व दलितांना मिळणाऱ्या सवलतींचा हेवा अन्य जणांना का वाटावा? आदिवासी अद्याप अशिक्षित, अज्ञानी, असंघटित व अजागृत आहेत. याचा फायदा अपात्र सबलतदार उठवत आहेत. खोटे, बनावट व मागासलेपणाचा बुरखा पांघरलेले लोक आदिवासींच्या सवलती हडप करीत आहेत. आदिवासींच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांबाबत गारे लिहितात, 'जमीन, जंगल आणि आदिवासीचे शोषण' या तीन बाबींचा त्यांच्या आर्थिक जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध आहे. भारतात आणि महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी आदिवासीनी जी बंडाळी केली त्याचे प्रमुख कारण जमिनीचा प्रश्न व त्यांचे शोषण हेच होत. या पत्रिकेमध्ये आदिवासींच्या नृत्यप्रकारांची ओळख विकास योजना, सैन्यभरतीपूर्व प्रशिक्षण, 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती' समस्या व उपाय' तसेच 'आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन इ. पुस्तकरुपाने प्रकाशित केली आहे. १९७९ साली सुरु झालेली संशोधन पत्रिका अजूनही कार्य करीत आहे.

महाराष्ट्रातील आदिवासीचे दर्शन घडविण्याच्या हेतूने कार्यकारी संपादक किसन साबळे (गुरुजी) यांनी 'महाराष्ट्र आदिवासी दर्शन' वार्षिक विशेषांक १ मे १९८५ रोजी धनकवडी, पुणे येथून प्रकाशित केला. फक्त ५ वर्ष हे वार्षिक चालले तरी त्या अंकाचे स्वरुप आणि अंतरंगातील लेख उद्बोधक होते. 'आदिवासी संस्कृती आणि शिक्षण, आदिवासी एक निराळा विचार, आदिवासीचे फलित, आदिवासीच्या जीवनातील नवी पहाट, 'आदिवासी जंगल व

जमिनविषयक कायदे', 'सातपुड्यातील शिक्षणाचे स्वरुप, बोहाडा आदिवासींचा विकास आणि नवीन आव्हाने', रानातील विखुरलेला रानमेवा' 'आदिवासी गीते' अशा प्रकारचे लेख असत. डॉ. एल्विन ते जी. ए. ग्रीअर्सन यांनी - आदिवासींची केलेली सेवा 'आदिवासींचा विकास आणि नवी आव्हाने' या लेखात सांगितलेली आहे. आदिवासी कार्यकर्ता नि परखड विचारांचा कवी वाहरु सोनवणे यांनी धुळे जिल्ह्यातील जंगलाकडे लक्ष वेधत 'आदिवासी जंगल आणि जमीनविषयक कायद्यांचा परिणाम' या लेखात कुळकायदा १९५७ ते १९८१ ची माहिती देताना लिहितात, " जंगल कमी होत आहे, दुष्काळ वाढत आहे! हजारो वर्षापासून असणारे जंगल आज मात्र मरणाच्या वाटेवर आहे. जंगलात पूर्वी एकरुप असलेला आदिवासी जंगलाबाहेर खेचला गेला आहे. तो बहुसंख्येने मजूर बनला असून, जंगलाप्रमाणेच हळूहळू त्याचाही जीव मरत चालला आहे" अशाच प्रकारची विश्वातील समस्त आदिवासींची वेदना आदिवासी कबी, साहित्यीक भुजंग मेश्राम यांच्या व्याख्यान व लेखनातून अभिव्यक्त होत असतांना दिसते. प्रांत व देशाच्या चौकटी न मानवणारी त्यांची भूमिका आदिवासीच्या प्रश्नाकडे आंतरराष्ट्रीय मूल्यभान पचवत व्यापक दृष्टीने पाहते. सत्यता मांडताना धक्कादायक विधान मेश्राम लिहितात, "औद्योगिक क्रांतीनंतर खानदानी शिकाऱ्यांना प्राणी समजून आदिवासीची शिकार करण्याची मुभा होती." (पृ. ८४) या विधानातील भीषणता अस्वस्थ करणारी आहे. त्याचेच दूसरे टोक म्हणजे "आदिवासींना स्वतःचे नाव, जात, व्याख्या ठरविण्याचीही मुभा नाही" बुध्दिवंताच्या वर्गीय हितसंबंधाची उकल करण्याचा भुजंग मेश्राम यांचा प्रयत्न मार्क्सवादी अभ्यासातून जन्माला आला असल्याचे स्पष्ट होते." आदिवासी साहित्यीक नियतकालिकातून चिंतनगर्भ विचार मांडतांना दिसतात.

'आदिवासी भारत' हे त्रैमासिक संपादक राजाभाऊ राजगडकर यांनी वणी, जि. यवतमाळ येथून १९८४ साली प्रकाशित केले. या मासिकाला मार्गदर्शन डॉ. भाऊ मांडवकर आणि डॉ. गोविंद गारे यांचे आहे. या त्रैमासिकाच्या मुखपृष्ठावर 'आदिवासीदर्शन' अशी अक्षरे असून शेजारी एखाद्या झाडावर माणसे चढावित तसे आदिवासी दाखवले आहेत. या मासिकाच्या अंतरंगात प्राणहितेचा शहीदवीर बाबुराव शेडमाके, 'आपण बंडखोराचे वारसदार होऊ या', 'माडियांची काव्यवृत्ती', 'आदिवासीना कसली भीती', 'आम्हीच या देशाचे गुलाम का? असे वैचारिक लेख असून 'आक्रोश', 'भिती, झोप' यासारख्या कथांनी वाचकांना वाचण्याची गोडी लावली आहे. प्रा. ग. बा. सरदार यांनी आदिवासी साहित्यिकांना व कार्यकर्त्यांना सांगितले की, 'दलित साहित्याने विद्रोहाचे जे निशान उभारले ते आदिवासी साहित्यिकांनाही मार्गदर्शन करणारे आहे. त्यासाठी आदिवासी साहित्यिकांनी कंबर कसलीच पाहिजे. अशा मार्गदर्शनाने नक्कीच आदिवासींच्या पदरात काही पडण्याची आशा वाटते"." कवी भडंग मेश्राम, डॉ. निलकांत कुळसंगे, व्यंकटेश आत्राम यांच्या कवितेने या मासिकाला तेवढीच प्रसिध्दी मिळाली आहे. भुजंग मेश्राम यांची कविता आदिवासी कवितेला दिशा दिग्दर्शन करण्याएवढी समर्थ ठरली असून तळातील मानवी समूहाचा स्वाभाविक उद्रेक मेश्राम यांच्या शब्दांनी इमान राखून पेलला आहे. 'आक्रोश' सारखी उषाकिरण आत्राम यांनी लिहिलेली कथा म्हणजे त्या काळातच नव्हे, तर आजही या आदिवासी पुत्रांचे काय होईल ते सांगताच येत नाही. म्हणून कुणावरही विसंबून न राहता ते लिहितात, "शतकानुशतकाच्या वनवासाने करपलेले हे जिणे कुणास दाखवावे... रचावी आपणच आपल्या अस्तासाठी चिता, कुणावर कशास रुसावे" पहिल्याच पिढीतील कवितेला मिळालेले हे आशयाचे लेणे

आदिवासी साहित्य प्रवाहाच्या विकासालाही सुयोग्य परिणाम देते. मुख्यतः आंबेडकर मार्क्स यांच्या काव्यात्मक पूजेने सर्व क्रांतीवादी तत्वज्ञान प्रवाहांना एकत्र बांधून भांडवलशाही, ( अपवादात्मक ब्राह्मणांचे विधायक सामर्थ्य सन्मानित करुन ब्राह्मणशाही, साम्राज्यशाहीचा विरोध करण्याचे व्यापक तात्वीक अधिष्ठान, हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याला स्वतःची अर्थपूर्ण संस्कृती आहे, बोली, रीतीरिवाज, दैवते आणि धर्मविधी आहेत. सण समारंभ व साहित्य कला आहेत. अरण्यवासी आदिम समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे हा समाज विभूतीपूजा झुंडशाही आणि हिहंसाचार या दुर्गुणापासून अलिप्त आहे. ह्याचे कारण त्याला लाभलेला सदृढ सांस्कृतिक वारसा होय. आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वी आदिवासी या देशाचे मूळ निवासी होते. अशा नियतकालिकाची नावे पुढीलप्रमाणे 'आदिवासी टाईम्स', 'साप्ताहिक क्रांतीपत्र', 'आदिवासी सपर्ष', 'कालतरंग', 'नाहारकंद', 'जागृती', एकजूट', 'महासंघवार्ता', 'जव्हार वार्ताहर', 'सा, गोंडवाना 'कोईतूर', 'शब्दमशाल', 'तारपा', 'बलवान', 'सह्याद्री', 'आदिरंग', 'एकलव्य', 'प्रेरणा', 'देवधन्', 'मर्मस्पर्शी, मूलनिवासी', 'गोडवाना, आदिवासी कर्मचारी समाचार, रानव्यथा', 'हुंकार', 'कोकणा दर्शन', 'आदिवासी नगारा', 'हाकारा', 'संदेश', 'जयसेवा', 'फडकी' अशा कितीतरी साप्ताहिक, पाक्षिक, मासिके, त्रैमासिके, षण्मासिके, वार्षिक, स्मरणिका, काही खास विशेष अंक या काळात उदयाला आले व आजही येत आहेत. १९५० ते २००२ या कालावधीत आदिवासींची चाळीसच्यावर नियतकालीके, अनियतकालिके निघाली. या कामी आदिवासी स्त्रियाही काही कमी नव्हत्या. सी. पुष्पाताई आत्राम यांनी 'ताराक', कुंदाताई मसराम यांनी 'जयसेवा' अशी मासिके चालविली. आदिवासींच्या उन्नतीसाठी आणि भविष्यकालीन वाटचालीसाठी समकालात त्या त्या नियतकालिकाची गरज होती. या सर्व व्यथावेदनांना मोकळी वाट, आदिवासींना उन्नतीसाठी प्रबोधन कार्य आणि आदिवासी चळवळीना गती देण्यास या नियतकालीकांची मोलाची मदत झाली.

**निष्कर्ष व समारोप:**

एकूणच आदिवासी संस्कृती धर्मपूर्व संस्कृती आहे, मानवी मूल्यांचा हा सांस्कृतिक ठेवा निष्ठेने जपला पाहिजे. आदिवासी नियतकालिके अनेक अडथळ्यांना पार करत, इतर सांस्कृतिक आक्रमणांना तोंड देत आदिवासी बोलीभाषा, परंपरा, संस्कृतीचे जतन व संवर्धन करतांना दिसतात. आदिवासी साहित्यीक 'उलगुलान', तारपा', 'आदिवासी' इ. नियतकालिकांतून आपले लेखन प्रकाशित करतात, शंबुक, कर्ण, एकलव्य हे पहिल्या फळीचे नायक मान्यतेच्या लढाईसाठी पुढे आले पण आता ते नायक नसून आताचे नायक मार्क्स फुले आआंबेडकर, दिम्नाद असल्याचे आदिवासी साहित्यीक सांगतात. तेव्हा आदिवासी नियतकालिकाने आदिवासी मुलांना आदिवासी क्रांतीवीरांचा, आदिवासी संस्कृतीचा तेजस्वी इतिहास सांगून त्यांचा स्वाभिमान वाढवावा मात्र त्यांना देववाद, अंधविश्वास शिकवू नये, भोगवादी संस्कृतीने आदिवासी संस्कृतीला विकृत करुन, आदिवासी अस्तित्वाला नाकारुन नष्ट करायला सुरवात केली आहे. तेव्हा अंधश्रध्देची विकृती नाकारुन विज्ञानवादी संस्कृती जतन करुन विकासाकडे वाटचाल करण्यासाठी अआंबेडकरी चळवळीसारखी सडेतोड रोखठोक विज्ञाननिष्ठा, समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, बुध्दीवादी समाजरचना, श्रमप्रतिष्ठा ह्या मानवी मूल्यांची जोपासना आणि स्विकार करुन अंधश्रध्देच्या गर्तेत लोटणाऱ्या भ्रामक कल्पना, अंधविश्वास, जादुटोणा इ.ना स्पष्ट नकार देण्याचे कार्य नवशिक्षित, प्रगल्भ विचारवंत, साहित्यीक नव्या पिढीने केले पाहिजे.

आदिवासी नियतकालिकांच्या काही मर्यादा म्हणजे शहरापासून दूर अंतर, किंवा नियोजनबध्दतेचा कमतरता, आर्थिक अडचण या अडथळ्यांना न जुमानता आदिवासी कला साहित्य, संस्कृतीचे जतन तद्वतच एका पिढीकडून उद्याच्या नवशिक्षित पिढीकडे विज्ञाननिष्ठेचा नवा चारसा संक्रमित करण्याचे कार्य साहित्य, संस्कृतीचे जतन आदिवासी नियतकालिकाने थोडी कळ सोसत निष्ठेने केल्यास आदिवासीच्या आयुष्यातही उज्ज्वल भविष्यकाळ आणि प्रगतीकारक वाटचाल करण्यास नक्कीच बाब मिळू शकतो. कारण आताच्या जागतिकीकरणाच्या युगात वाचनसंस्कृती कमी झालेली असतांना आणि निरर्थक धार्मिक उत्सवांना पेव फुटलेले असतांना मागास आदिवासींच्या प्रगतीच्या दृष्टीने आदिवासी नियतकालिके चालविणे हे एक आव्हान ध्येयनिष्ठ नियतकालिकांनी पेलेलेले दिसते. या दृष्टीने सामजिक आणि सांस्कृतिक जाणीवा नि जागृती समाजात निर्माण झाल्यास आदिवासी नियतकालिके, आदिवासीपर्यंत नक्कीच पोहबतील आणि त्याचे मुल्यात्मक परिणाम दिसतील.

**संदर्भग्रंथ:**


१) 'मराठी वाङ्गचाचा इतिहास', संपादक श. गो. तुळपुळे, खंड पहिला, प्रथम आवृती, २ डिसेंबर १९८४.

२) आदिवासी प्रतिभावंताचे मराठी साहित्य डॉ. श्रीपाल सबनीस, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. २५१ क. शनिवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती २०१८. पृष्ठ क्र. ३०

३) डॉ. व्हेरिअर एल्विन ह्यांच्या 'आदिवासी विकास विषयक तात्त्विक धोरणप्रणालीची उत्क्रांती, जॉन गायकवाड, डॉ. एल्विन विशेषांक, हाकारी, पुणे, वर्ष १० वे.

४) आदिवासी साहित्य आणि साहित्यिका', संपादक प्रा. डॉ. कृष्णा भवारी, चेतक बुक्स प्रकाशन, आवृत्ती ९. ऑगस्ट २०१३, रचना क्रिएशन्स, पुणे, पृष्ठ ८२

५) 'आदिवासी साहित्य आणि साहित्यिक, संपादक प्रा. डॉ. कृष्णा भवारी, चेतक बुक्स प्रकाशन, आवृत्ती ९ ऑगस्ट २०१३, रचना क्रिएशन्स, पुणे, पृष्ठ ८२

६) 'आदिवासी साहित्य चिंतन आणि चिकित्सा' डॉ. तुकाराम रोंगटे, दिलिपराज प्रकाशन, प्रथमावृत्ती २६ जानेवारी २०१४, शनिवारी पेठ, पुणे, पृष्ठ क्र. ११९.

७) 'आदिवासी साहित्य: नियतकालिकातील डॉ. तुकाराम रोंगटे, डिंपल पब्लिकेशन, गिरगाव, मुंबई, प्रथम आवृत्ती, ६ डिसेंबर २००७, पृष्ठ क्र. ३५

८) 'आदिवासी जंगल समस्या व प्रश्न, वाहरू सोनवणे, 'महाराष्ट्र आदिवासी दर्शन, १ मे १९८६ शिक्षण संस्कृती विशेषांक, पुणे, पृ. ३८

९) 'आदिवासी प्रतिभावंताचे मराठी साहित्य डॉ. श्रीपाल सबनीस, दिलिपराज प्रकाशन प्रा. लि. २५१ क. शनिवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती २०१८, पृ. क्र. ३३

१०)सरदार ग. बा. 'आदिवासींचे प्रश्न व त्यांचे साहित्यातील प्रतिबिंब', आदिवासी भारत, वणी, जुलै, डिसेंबर १९८४, संयुक्त अंक, पृ. ६

११)गोंडवन पेटले आहे', तुमराम विनायक, एकलव्य प्रकाशन, चंद्रपूर, प्रथम आवृत्ती, १९८७, पृ.६

१२)'आदिवासी साहित्य स्वरुप आणि समीक्षा, डॉ. विनायक तुमराम, प्रथम आवृत्ती, सीताबर्डी, नागपूर, १७/११/१९९४, पृष्ठ क्र. १.